दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ३३५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.१ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# सरकारकडून मागण्या मान्य, संभाजीराजेंनी उपोषण सोडले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मुंबईतील आझाद मैदानात खासदार संभाजी छत्रपती यांनी आज केलेलं उपोषण आज अखेर मागे घेतलं आहे. राज्य सरकारकडून मागण्या मान्य झाल्यानंतर त्यांनी तीन दिवसांनी उपोषण सोडलं आहे. राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील आणि सांस्कृतिक मंत्री अमित देशमुख यांनी संभाजी छत्रपती यांची आझाद मैदानात भेट घेऊन त्यांच्या मागण्या मान्य केल्याचं लेखी पत्र त्यांना सुपूर्द केलं.**



यावेळी एकनाथ शिंदे यांनी मान्य करण्यात आलेल्या सर्व मागण्या सर्वांसमोर वाचून दाखवल्या. संभाजीराजेंनी केलेल्या सर्व मागण्या पूर्ण केल्या असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. कोणकोणत्या मागण्या राज्य सरकारनं मान्य केल्या आहेत. सारथीकडून कौशल्य विकासाचे कार्यक्रम एका महिन्यात सुरु करण्यात येतील. सारथी Vision Document तज्ञांचा सल्ला घेऊन ३०/०६/२०२२ पर्यंत तयार करण्यात येईल. सारथीमधील रिक्त पदे दि. १५ मार्च, २०२२ पर्यंत भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. प्रामुख्याने सारथी संस्थेची ८ उपकेंद्र १५ मार्चच्या आत सुरु करणे तसेच या संस्थेसाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरिक्त १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मराठा समाजासाठी तयार करण्यात आलेल्या २३ वसतिगृहांपैकी जी वसतिगृहे बांधून तयार आहेत त्यांचे मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते गुढीपाडव्याच्या दिवशी उद्घाटन करण्यात येईल. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या लढ्यात जीव गमावलेल्या सर्व वारसांना लवकरात लवकर सरकारी नोकरी देण्यात येईल तसेच गंभीर गुन्हे वगळता इतर गुन्हे मागे घेण्यासाठी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील दर महिन्याला आढावा घेऊन निर्णय घेतील. मराठा समाजाच्या तरुणांची ०९/०९/२०२० रोजी एमपीएससी द्वारे निवड झाली मात्र सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षण रद्द केल्यामुळे नियुक्ती मिळू शकली नाही, अशा सर्व उमेदवारांबाबत अधिसंख्य पदे तयार करून त्यांना नोकरीत सामावून घेण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला चालू आर्थिक वर्षात मंजूर रु. १०० कोटी पैकी रु.८० कोटी प्राप्त झाले आहेत. उर्वरीत रु.२० कोटी उपलब्ध करुन देण्याबरोबरच पुरवणी मागणीव्दारे अतिरिक्त १०० कोटी रुपये निधी उपलब्ध देण्यात येईल. परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जावरील व्याज परताव्या बाबत धोरण तयार करण्यात येत आहे. व्याज परताव्यासाठी कर्जाची मुदत रु.१० लाखावरून रु.१५ लाख करण्यात येईल. कोपर्डी खून खटला प्रकरणी माननीय उच्च न्यायालयात दाखल अपिलाची सुनावणी तातडीने घेण्याबाबत महाधिवक्ता यांना विनंती करून दि.२ मार्च,२०२२ रोजी प्रकरण मेंन्शन करण्यात येईल.

# पनवेल शहरातील अपूर्ण तहसील कार्यालयाच्या इमारतीबाबत उपोषण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील गेल्या कित्येक वर्षांपासून रखडलेले नवीन तहसील कार्यालयाच्या इमारती बाबत रघुनाथ वासुदेव प्रधान यांनी साईनगर येथील तहसील कार्यालयासमोर उपोषणाला सुरुवात केली आहे.



पनवेल येथील तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी २०१२ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली. हे काम मनोज एंटरप्राइजेस यांना २०१३ मध्ये देण्यात आले. मात्र गेल्या कित्येक वर्षांपासून या इमारतीचे काम अर्धवट आहे. या इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी रघुनाथ प्रधान यांनी उपोषण सुरू केले आहे. २८ फेब्रुवारी रोजी त्यांनी साईनगर येथील तहसील कार्यालय समोर उपोषणाला सुरुवात केली. साईनगर येथे तहसील कार्यालयात जाण्यासाठी नागरिकांना रिक्षा करून यावे लागत आहे. यासाठी पैसे खर्च होतात. त्यामुळे निधीअभावी काम रखडलेली असल्याने तो निधी मिळावा आणि लवकरात लवकर तह-सील कार्यालयाचे काम पूर्ण व्हावे अशी माफक अपेक्षा रघुनाथ प्रधान यांची आहे.

# सोशल मीडियावरील पोस्ट प्रकरणी भाजप उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांना जामीन मंजूर

**दै.रायगड नगरी । पेण**

पोस्को गुन्ह्यातील प्रत सोशल मीडियावर व्हायरल केल्या बाबत अलिबाग सत्र न्यायालयाने भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटलांसह अन्य दोघांना जामीन मंजूर केला आहे.



सविस्तर घटना अशी की, पेणचे आमदार रवींद्र पाटील यांचे पुत्र तथा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या सह दोघांना पोस्को गुन्ह्यातील प्रत सोशल मीडियावर व्हायरल केल्या बाबत अलिबाग कोर्टाने तंत्रज्ञान अधिनियमन अंतर्गत तीन महिने कैद व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.

मात्र वैकुंठ पाटील यांनी आज सोमवार (दि.२८) रोजी अलिबाग सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला असता त्यांची तात्काळ जामिनावर सुटका करण्यात आली. दरम्यान या प्रकरणाबाबत वैकुंठ पाटील यांनी अलिबाग न्यायालयाच्या निकालाचे सन्मान करीत उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# माणगाव मधील गोळीबार प्रकरणातील जखमी शुभम जैस्वाल याच्या वडिलांना धमकीचा फोन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

मोबाईल कॉल करुन दोन करोड ची मागणी करणाऱ्या अज्ञात इसमा विरुध्द माणगांव मधिल मेडिकल स्टोअर व्यवसायिक ग्यानचंद जैस्वाल यांनी २७ फेब्रुवारी २०२२ रोजी दिलेल्या तक्रारी नुसार माणगांव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असुन जयसवाल यांना कॉल करुन धमकी देणाऱ्या अज्ञात इसमा विरुध्द कॉ.गुन्हा रजि.नंबर ४४/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३८५,५०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माणगाव शहरात कचेरी रोड वर ११ फेब्रुवारी रात्री १२ वाजून १० मिनिटांनी शारदा स्वीटस समोर २४ वर्षीय युवक सोनी मेडिकलचे मालक यांचा मुलगा शुभम जयस्वाल याच्यावर पिस्तुल म्हणजे गावठी कट्टा याद्वारे गोळीबार करून हत्या करण्याचा प्रयत्न झाला होता. माणगांव तालुका व शहरात असा पाहिल्यादा प्रकार झाल्यामुळे माणगाव तालुका वासीयांची चिंता वाढली आहे. असे असले तरी माणगांव पोलीस ठाण्याचे नवनियुत वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील व माणगाव पो-लीस ठाण्याच्या सर्व टीम ने झालेल्या प्रकाराचा छडा लावण्यासाठी सर्व शाखानी ॲक्शन मोड घेतला होता.

यामध्ये घटना झालेल्या ठिकाणापासूनचे सर्व सीसी टीव्ही कॅमेरे चेक करण्याच्या मागे माणगाव पोलीस ठाणे टीम कार्यरत झालेली होती. यामध्ये १२ फेब्रुवारी वारी रोजी माणगांव कळमजे पुलाजवळ एक काळा व निळा पट्टा असलेली पल्सर बाईक क्रमांक एम एच ४३ ए एस ६६७४ ही बाईक व हेल्मेट फिर्यादी याने सांगितल्या वर्णनाप्रमाणे आहे व ती माणगाव पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहे. मात्र ही बाईक चोरीची असल्याची माहिती देखील सूत्रांकडून समजली होती. तसेच माणगाव पोलिस ठाणे निरीक्षक यांनी गोपनीय शाखा, बिट मार्शल, दामिनी पथक, हिरकणी कक्ष असे सर्व युनिट ॲक्टिव्हेट करत तपासला वेग दिला होता. यामध्ये १३ फेब्रुवारी ज्या ठिकाणी ही निनावी बाईक सापडली त्या ठिकाणी ब्रिज खाली उतरून रायगड जिल्हा आपत्ती व्यापस्थापन कक्षाचे पाणबुडे म्हणजेच प्रशांत साळुंके यांच्या रेस्क्यू टीम चे जवान इलियाझ धवलारकर व कबीर मुल्ला यांनी पोलीस तपासात माणगाव पोलिसांची मदत केली.

गोळीबार होऊन जखमी झालेला शुभम जैस्वाल आता आईवडील पुण्याई व ईश्वराच्या कृपेने आता ठीक आहे. शस्त्रक्रियेनंतर तो माणगांव च्या घरी परतला आणि काही दिवसातच त्याचे वडील ग्यानचंद जैस्वाल यांना धमकीभरा फोन आला पोलीस .../२

# वरसे येथे १०० खाटांच्या स्त्री रुग्णालयाला मंजूरी : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । रोहा**

महिलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी अत्याधुनिक उपकरणांसहित रोहा तालुक्यातील वरसे येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उभारणीला आरोग्य विभागाची विशेष बाब म्हणून तत्वतः मंजुरी मिळाली असल्याची माहिती पालकमंत्री आदिती तटकरे यांनी बोलाविलेल्या पत्रकार परिषदेत दिली. हे स्त्री रुग्णालय महिलांसाठी विशेष वरदान ठरेल असे त्यांनी सांगितले.



वरसे ग्रामपंचायत हद्दीतील महसूल विभागाच्या मालकीची तब्बल २ हेक्टर जागा या स्त्री रुग्णालयासाठी उपलब्ध झाली आहे. विशेष बाब म्हणून स्त्री रुग्णालयाला मंजुरी मिळावी, असे आमचे मागील सहा महिन्यापासून प्रयत्न होते. अखेर १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उभारण्याला आरोग्य विभागाची तत्वतः मान्यता मिळाली, अशी महत्त्वपूर्ण माहिती ना. तटकरेंनी पत्रकारांना दिली. शासकीय विश्रामगृह सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेला कार्याध्यक्ष मधुकर पाटील, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, सभापती अनिल भगत, तहसीलदार कविता जाधव, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, शहराध्यक्ष अमित उकडे आदी मान्यवर उपस्थित होते. रोह्यात आधुनिक स्त्री रुग्णालयाची घोषणा पालकमंत्र्यांनी केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. महिलांनी पालकमंत्र्यांच्या निर्णयाचे स्वागत केले. आता स्त्री रुग्णालय प्रत्यक्षात कधी साकार होणार ? हे पाहावे लागणार आहे.

उपजिल्हा रुग्णालय रोहा आता येथे ५० खाटा आहेत, आता इतर ठिकाणच्या जागेत अधिक ५० खाटांची व्यवस्था होणार आहे, त्यादृष्टीने डॉक्टर्स, स्टाफ उपलब्ध होईल, लोकांना तातडीने तेवढ्याच गरजेच्या सुविधा मिळतील असे यावेळी अदिती तटकरेंनी यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेत लवकरच आमसभा घेण्यात यावी अशी मागणी झाली, कोरोनाकाळाचा फायदा घेत काही लोकप्रतिनिधी, ठेकेदार यांनी निकृष्ट दर्जाची विकासकामे केली. रस्ते, गटारे, समाज मंदिर मुख्यत: पाणी योजना निकामी ठरल्या, याबाबत लोकांमध्ये नाराज आहे, त्यासाठी आमसभा घ्या, शहर व ग्रामीण भागातील निकृष्ट कामांबद्दल लोकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.

अधिकारी व ठेकेदार यांच्याकडून लोकांना उत्तरे अपेक्षित आहेत अशी मागणी होताच पालकमंत्री आदिती तटकरेंनी आमसभेसाठी अप्रत्यक्ष संमती दिली. आता पालकमंत्री आदिती तटकरे आमसभा घेतात का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त...

### आज राज्यात करोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्येत मोठी घट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात करोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्या गेल्या काही दिवसांपासून कमी होत असून आज ती ४०७ अशी निच्चांकी खाली आल्याने राज्याला मोठाच दिलासा मिळाला आहे. तसेच आज मृत्युसंख्येतही मोठी घट झाली आहे. आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या २४ तासात ४०७ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. तर, आज राज्यात एकूण ४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर दिवसभरात ९६७ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. या बरोबरच राज्यात आज एकूण ६ हजार ६६३ रुग्णांवर (सक्रिय रुग्ण) उपचार सुरू आहेत. राज्यात आजपर्यंत एकूण ७७ लाख ११ हजार ३४३ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.०४ टक्के झाले आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ७ कोटी ७८ लाख ७५ हजार १०४ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ७८ लाख ६५ हजार ७०५ नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. हे प्रमाण १०.१० टक्के इतके आहे. सध्या राज्यात १ लाख ३२ हजार ८८६ व्यक्ती होम क्वारंटाइनमध्ये आहेत, तर ६५३ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाइनमध्ये आहेत.

# पेपर मिल कंपनीमुळे हजारो नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## कंपनीच्या विरोधात ग्रामपंचायत सदस्य तृप्ती पांचाळ यांचे उपोषण



**दै.रायगड नगरी । खोपोली**

न्यू बॉम्बे पेपर मिल कंपनीच्या प्रदूषणामुळे जांभिवली गावासह परिसरातील हजारों नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मागील पाच वर्षापासून या विरोधात पाठपुरावा सुरू असतानाही कंपनीवर कारवाई न झाल्याने झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी जांभिवली ग्राम पंचायत सदस्य तृप्ती महेश पांचाळ सह जांभिवली ग्रामस्थांनी तहसील कार्यालयाबाहेर उपोषणाला बसण्याचा मार्ग पत्करला आहे.

मागील पाच वर्षापासून या कंपनीतून काळी कच हवेतून जांभिवली गावातील घरांसह संपूर्ण परिसरात पसरत आहे. हे काळे कण हवेतून जेवणात तसेच पिण्याच्या पाण्यात मिसळत असल्याने सर्दी, खोकला, घसा खवखवणे, अस्थमा यासह अनेक आजार या गावातील ग्रामस्थांना होत असल्याचे ग्राम पंचायत सदस्य तृप्ती महेश पांचाळ यांच्यासह ग्रामस्थांकडून प्रसार माध्यमांना सांगण्यात आले.

या कंपनी विरोधात प्रदूषण विभाग, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, पोसली ठाण्यात लेखी तक्रार करण्यात आली आहे. पण आतापर्यंत कंपनीवर योग्य ती कारवाई न करण्यात आल्याने व कार्बन कणाचा त्रास जास्तच वाढल्याने ग्राम पंचायत सदस्य तृप्ती महेश पांचाळ यांच्या नेतृत्वाखाली गावकऱ्यांनी तहसील कार्यालयाबाहेर उपोषण सुरू केले आहे.

हजारों नागरिकांच्या जीवाला धोका असताना न्यू बॉबे कंपनीच्या बाजूने सर्व शासकीय यंत्रणा उभी ठाकली असून ग्रामस्थाना वाऱ्यावर सोडण्यात आल्याचा आरोप, उपोषणकर्त्यांनी केला आहे. दरम्यान, माझ्या जीवितास काही कमी जास्त झाल्यास त्याला सर्व प्रशासन जबाबदार असेल याची नोट खालापुर तहसीलदार, असे ग्राम पंचायत सदस्य तृप्ती पांचाळ यांनी सांगितले. कंपनी विरोधात खालापुर पंचायत समिती, पोलिस स्टेशन, ग्राम पंचायत जांभिवली, रायगड जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक यांना नोटीशीद्वारे देण्यात आली असल्याचेही पांचाळ यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.

# राज्याच्या मुख्य सचिवपदी मनुकुमार श्रीवास्तव


## तर मुंबई पोलीस आयुक्तपदी संजय पांडे

दै.रायगड नगरी । मुंबई

महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवपदी मनुकुमार श्रीवास्तव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी संजय पांडे यांची नियुक्ती केल्यानंतर मुख्य सचिवपदीही शासनाने नवी नियुक्ती जाहीर केली आहे. मनुकुमार श्रीव-ास्तव हे १९८६ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. सेवा ज्येष्ठतेनुसार श्रीवास्तव यांची मुख्य सचिवपदी वर्णी लागलेली आहे. मावळते मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती यांना मुदतवाढ न मिळाल्याने ते आज निवृत्त झाले.



**मनुकुमार श्रीवास्तव, मुख्य सचिव**



**संजय पांडे, मुंबई पोलीस आयुक्त**

मनुकुमार श्रीवास्तव सध्या गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आहेत. देबाशिष चक्रवर्ती यांच्या निवृत्तीनंतर मनोज सौनिक आणि नितीन करीर यांच्या नावाची मुख्य सचिवपदासाठी चर्चा होती. पण सेवा ज्येष्ठतेनुसार श्रीवास्तव यांना संधी मिळाली. श्रीवास्तव यांना गायनाचा छंद आहे. दररोजच्या बिझी शेड्यूलमधूनही ते आपल्या छंदासाठी वेळ काढतात. सुमधूर आवाजामुळे त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. त्यांचं युट्यूब चॅनेलही आहे. त्या माध्यमातून .../२

# खांदेश्वर बंगाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे,व युवासेना प्रमुख व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्य प्रणालीवर प्रेरित होऊन तसेच शिव-सेना जिल्हाप्रमुख रायगड शिरिष घरत यांच्या नेतृत्वाखाली खांदेश्वर बंगाली असोसिएशनचे अध्यक्ष अशिम कुमार सिन्हा देव, सचिव प्रदीप दत्ता, उपसचिव श्यामलाल हिरा, सर्व उपाध्यक्ष, सदस्य, ज्येष्ठ सदस्य, प्रमुख महिला पदाधिकारी यांच्यासह साडेतीनशे महिला व पुरुष पदाधिकारी यांनी भाजपला रामराम करून शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला आहे, हा पक्षप्रवेश खांदा कॉलनी शहरप्रमुख सदानंद शिर्के यांच्या अथक प्रयत्नाने जाहीर पक्ष प्रवेश केला.

तसेच मराठी राजभाषा दिवस निमित्त शिवसेना युवासेना आयोजित माझी स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले त्यात जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सहभाग दर्शविला. यावेळी .../२


# रसिकहो संस्थेच्या वतीने काव्य सुमनांनी मराठी भाषा गौरव दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठी भाषा गौरव दिनहा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवीविष्णू वामन शिरवाडकरउर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. पनवेल च्या काव्य प्रेमींच्या रसिकहो या संस्थेच्या वतीने ७ कवींनी स्व रचना सादर करून मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला . ऑनलाईन पद्धतीने साजरा झालेल्या या कार्यक्रमाचा शेकडो काव्य रसिकांनी आनंद लुटला.

सुप्रसिद्ध कवी गीतकार आशिष चौबळ यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रथितयश कवी आणि नवकवी यांची उत्कृष्ट सांगड घालत कार्यक्रमाची संरचना करण्यात आली होती. मनातली कविता असे शीर्षक घेऊन पनवेल परिसरातील सात कवींनी स्वरचित काव्य रसिकांसमोर सादर केली. आशिष चौबळ, संपदा देशपांडे, मंदार दोंदे, सानिका पत्की, अनघा गुप्ते, योगेश शृंगारपुरे, दिपाश्री गडकरी यांनी सादर केलेल्या काव्य पुष्पांना ऑनलाईन उपस्थित असणाऱ्या रसिकांनी भरभरून दाद दिली.

आशिष चौबळ यांनी हृदयस्पर्शी पद्धतीने सादर केलेल्या प्रेमाच्या तीन छटा,संपदा देशपांडे यांच्या अभ्यासपूर्ण पद्धतीने विणलेल्या आशयघन रचना,मंदार दोंदे यांची विविध पद्धतीच्या काव्य सुमनांची उधळण, सानिका पत्की यांच्या भावस्पर्शी




कविता, तसेच स्वर्गवासी गानकोकिळा लता मंगेशकर यांना वाहिलेली काव्य श्रद्धांजली, योगेश शृंगारपुरे यांचे खुमासदार सादरीकरण, दिपाश्री गडकरी च्या लाडिकवाळी कविता यामुळे कार्यक्रमाला विलक्षण उंची प्राप्त झाली होती. विशेष म्हणजे पारंपारिक पद्धतीने होणाऱ्या सुत्रसंचालन पद्धतीला छेद देत, मनमोकळ्या गप्पा टप्पा यांच्या माध्यमातून उत्तमोत्तम काव्यरचना सादर करण्याच्या अभिनव संकल्पनेमुळे हा कार्यक्रम काव्य रसिकांच्या चिरकाल स्मरणात राहील यात जराही दुमत नाही.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेलने साजरा केला मराठी भाषा गौरव दिन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, कामगार कल्याण केंद्र पनवेलने जेष्ठ साहित्यिक वि.वा.शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या जन्मदिना निमित्त मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात बालग्राम, पनवेल येथे साजरा केला.

यात्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. नीलिमा अरविंद मोरे, प्रमुख पाहुणे, असिस्टंट संचालक, नॅशनल सेफ्टी कौन्सिलचे महेंद्र शहाणे, प्रमुख वक्ते, गुणवंत कामगार व विशेष सहाय्यक, बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल शाखा, विशेष अतिथी पत्रकार मयूर तांबडे, कार्बन बिर्ला प्रा. ली. चे एच.आर. मॅनेजर, सचिन कंदले, लॉजिस्टिक अधिकारी संदीप उपाध्ये, सोलर ऍक्टिव्ह फार्म, बालग्रामचे अधीक्षक, डॉ. विनायक पाटील व कामगार कल्याण मंडळाचे केंद्र प्रमुख प्रवीण सकट आदी मान्यवर उपस्थित होते.

यात्रसंगी प्रमुख वक्ते गुणवंत कामगार अरविंद मोरे यांनी मराठी दिन साजरा करत असल्याबद्दल महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कौतुक करून आभार मानले. अरविंद मोरे पुढे म्हणाले की, मातृभाषा ही हृदया पासून जोडलेली असते. मातृभाषेत आपण आपले विचार दुसऱ्यानं पर्यंत चांगल्या प्रभावी पद्धतीने पोहचवू शकतो. मराठी भाषा ही



संदेश पोहचविण्याचे चांगले माध्यम आहे. मराठी भाषा ही समृद्ध भाषा आहे. मराठी भाषेत प्रत्येक गोष्टीचा शब्द आहे. त्याला इतर भाषां मधून शब्द निर्यात करावे लागत ना-हीत. आपण प्रत्येकाला आपल्या मराठी भाषेचा अभिमान असला पाहिजे. आपली मराठी भाषा समृद्ध करण्याची प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. ध्यासाठी आपण सर्वांनी निर्भीड पणे मराठी बोलणे, लिहिणे व इतरांना प्रोत्साहन देणे फार गरजेचे आहे. त्यांनी मराठी दिनाच्या सर्वाना शुभेच्छा दिल्या.

यात्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे यांनी आपण मराठी दिन का साजरा करतो यासाठी सुरुवातीला कुसुमाग्रजांच्या साहित्याचा आढावा घेतला. त्यांनी यात्रसंगी मराठी भाषेतील इतरही साहित्यिकांच्या योगदानाबद्दल सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने आजचा स्तुत्य उपक्रम राबवून ख्ऱ्या अर्थाने मराठी भाषा संवर्धनाचे काम केले अशा त्या म्हणाल्या. त्यांनी भाषा कशी लोप पावते ह्याचे उदाहरण देऊन आपली मराठी भाषा लोपू नये ह्यासाठी विविध सूचना केल्या. डॉ. नीलिमा अरविंद मोरे यांनी ज्ञानेश्वरांनी मराठीची काव्य परंपरा सांगितली असे सांगितले. त्या हे पण म्हणाल्या की, मराठी भाषेला ज्ञानेश्वरांनी साहित्याच्या शिखराला हिमालयाची उंची मिळवून दिली व ज्ञान भांडार सर्वांना खुले करून दिले. यात्रसंगी उपस्थित विशेष अतिथी मयूर तांबडे, महेंद्र शहाणे, संदीप उपाध्ये व सचिन कंदले यांनी सुद्धा मनोगत व्यक्त करून मराठी भाषेच्या शुभेच्छा दिल्या.

यात्रसंगी प्रमुख अतिथी लोकमतचे युवा पत्रकार मयूर तांबडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्र संचालन केंद्र प्रमुख प्रवीण सकट यांनी केले तर आभार प्रदर्शन वैजयंती हिने केले.

# पालीतील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रात मराठी राजभाषा दिन उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

ग.बा. वडेर हायस्कुल आणि व. ग. ओसवाल ज्युनियर कॉलेज पाली येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्रात रविवारी (ता.२७) मराठी राजभाषा दीन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मराठी भाषा जतन आणि संवर्धन करणे काळाची गरज आहे या विषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी मराठी भाषेचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवर व अभ्यास केंद्राच्या विद्यार्थ्यांनी भाषणातून मराठी भाषा दिनाविषयी माहिती सांगितली. अभ्यास केंद्राचे तांत्रिक सहाय्यक डी. बी. शिद यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तर अभ्यासकेंद्राचे सहायक संदीप कणघरे यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले.

यावेळी केंद्राचे समंत्रक आदिनाथ पोटे, किसन वारघडे, रामराव मनवर, सूरज मेंडन, राकेश बेलोसे, अजित खरोसे व तालुका कृषी अधिकारी अशोक महामुनी व अभ्यास केंद्राचे विद्यार्थी उपस्थित होते.



# राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत गुणवंत विद्यार्थी प्रबोध शिर्केचे सुयश

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत माणगांवचा प्रबोध दत्ताराम शिर्के हा विद्यार्थी चमकला. रायगड जिल्हा माहिती कार्यालय व श्री छत्रपती शिव-ाजी महाराज सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध लेखन स्पर्धेत इयत्ता पाचवी ते सातवी च्या प्रथम गटात दुसरा आल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कु.प्रबोध हा ना. म. जोशी विद्याभवन गोरेगाव येथील सातवी चा विद्यार्थी असुन त्याने विविध स्पर्धेत प्रावीण्य मिळविले आहे. पाचवीच्या स्कॉलरशिप परीक्षेत जिल्ह्यात पहीला आल्याने त्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी सुतारवाडी येथे बोलावुन कौतुक केले होते. तसेच आमदार बाळाराम पाटील यांनीही जिल्हा परिषद अलिबाग येथील वाजेकर सभागृहात त्याचा सत्कार करून अभिनंदनचा ठराव संमत करून घेतला होता.

नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण होऊन तो जिल्ह्यात पहिला आला होता.

अशाप्रकारे सर्वगुणसंपन्न असलेल्या प्रबोधची तबला वादक म्हणूनही माणगांव मध्ये ओळख आहे. त्याच्या यशामागे त्याचे आई वडील व गुरुजनांचा मोलाचा वाटा आहे. आता निबंध लेखन स्पर्धेतील या यशाने त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# कलम वाडीतील ग्रामस्थांना थेट नळाद्वारे शुद्ध पाणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील कलम वाडी येथे स्वदेश फाऊंडेशन व लोकवर्गणीतून तयार केलेल्या शुद्ध नळ पाणी योजनेचा उद्घाटन सोहळा नुकताच संपन्न झाला. या योजनेमुळे कलम वाडीतील ग्रामस्थांना नळाद्वारे शुद्ध पाणी थेट घरापर्यंत मिळाले आहे.

पाणी हे जीवन आहे, मुबलक व शुद्ध पाणी असेल तर मानवी जीवन सुखकर होते.पाण्यासाठी महिलांची होणारी वणवण भटकंती व हाल थांबावेत या उद्देशाने स्वदेस फाऊंडेशन ने पुढाकार घेऊन कृतिशील काम हाती घेतले आहे. यातूनच ही योजना साकारली असल्याचे समाधान आता ग्रामस्थ व महिला व्यक्त करीत आहेत.

यामुळे लोकांची पाण्याची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागली आहे. उद्घाटनावेळी सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार, सरपंच उमेश यादव, भाग्यश्री पाठारे, संतोष भोईर, स्वदेशचे दयानंद माने, उपसरपंच योगेश सुरवकर, ग्रामसेवक ए. टी. गोरड, रमेश पवार, कृष्णा वाघमारे, बबन वाघमारे, तुकाराम पवार, मंगेश यादव, गंगाराम सावंत, अंकेश पोंगडे, आशिष यादव, सतीश कदम, प्राची कदम, मनीषा पोंगड आदींसह ग्रामस्थ उपस्थितीत होते.

सिद्धेश्वर कलम वाडी स्वदेस गावविकास समिती, दयानंद माने, राकेश बारस्कर, प्रवीण पाटील यांनी योजना कार्यान्वित करण्यासाठी मेहनत घेतली. तसेच नंदू पवार, तुळशीराम पवार, मालू पवार, रवींद्र यादव, सुनील पोगडे, गणेश यादव, कृष्णा वाघमारे यांनी सहकार्य केलं आणि योजना पूर्णत्वास नेली.

## ई - निविदा सुचना

रायगड जिल्हा परिषद-अलिबाग अंतर्गत आरोग्य विभागाकरीता सन २०२१-२२ वर्षाकरिता औषध व साहित्य, साधन सामुग्री खरेदी करून प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरविणेसाठी ई-निविदा सुचना **http//mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे, निविदेबाबतीत सर्व माहिती संकेतस्थळावर देण्यांत आलेली आहे.

## दैनिक रायगड नगरी

वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन
(सेंट्रल रुल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**१) प्रकाशन स्थळ** : १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स टिळक रोड, जुने रतन टॉकीजवळ, पनवेल-४१०२०६, जि.रायगड
प्रकाशनाचे कालमान : दैनिक
**२) मुद्रकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**३) राष्ट्रीयत्व** : भारतीय
**४) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल-४१०२०६, जि.रायगड
**५) मालकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**६) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल-४१०२०६, जि.रायगड
**७) संपादकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**८) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल-४१०२०६, जि.रायगड

मी **सुनिल कृष्णाजी पोतदार** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.
दि.१ मार्च २०२२

**सही/-**
**सुनिल कृष्णाजी पोतदार**
**(प्रकाशकाची सही)**

# विज्ञान दिन उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे सायन्स असोसिएशन आणि आय क्यू ए सी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी जी पवार यांच्या हस्ते पार पडला.

**म्हसळा नगर पंचायत, म्हसळा**
**जाहीर नोटीस**

**जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/ ९७४५/ २०२२ दिनांक :- २८/०२/२०२२**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्याप्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मालमत्ता क्रमाक | | | | |
| १ | २ | ८६५ पैकी | कुंभारवाडा | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०१ | नासीर हाजिमिया पटेल | सईद बद्रूद्दीन जंजीरकर |
| २ | २ | ८६५ पैकी | कुंभारवाडा | आर. सी. सी. पद्धतीत G + २ ची इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०६ | नासीर हाजिमिया पटेल | अल्ताफ हुसैन उस्मान हुर्जुक |
| ३ | २ | १७९६ पैकी | दिघीरोड | आर. सी. सी. पद्धतीत इमारत स्टील प्लॅन बांधलेली इमारत तिसरा मजला फ्लॅट नं. ३०५ | रियाज हसन वस्ता | अल्ताफ हुसैन अब्दुल गफूर काजी |
| ४ | २ | १४७९ पैकी | दिघीरोड | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं. १ | अफसरी शकील कादिरी | नूरजहान अशफाक गणतारे |
| ५ | २ | ३६३ पैकी | तांबटआळी | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. २ बिल्टप क्षेत्र | प्रविण विनोद बनकर | तुकाराम गोपाळ गिजे |
| ६ | २ | १९५२ पैकी | दिघीरोड | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०४ बिल्टप क्षेत्र | नईम नूरमहमद कुडकीकर | नुजत अशफाक काझी |
| ७ | २ | २०१४ पैकी | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०१ | दिलशाद अब्दुल सत्तार पेणकर | नवीद हिदायतुल्ला हवालदार |
| ८ | २ | १८१५/१ व १८१५/०१ | नवानगर | सिल्व्हर अपार्टमेंट आर.सी.सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळमजला गाळा नं. १ व फ्लॅट नं. ०१ | इम्रान महमंद सईद बलडे | सुहेल इस्माईल अकलेकर |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत

पृष्ठ क्र.१ वरुन...

# माणगाव मधील गोळीबार प्रकरणातील जखमी शुभम जैस्वाल याच्या वडिलांना धमकीचा फोन

सूत्रांच्या माहितीनुसार त्यामध्ये समोरील व्यक्तीने असे असे म्हटले आहे की तुने तेरे बच्चे को तो बचाया.अभि मै तेरेको देखता हू!! या संदर्भीय घटनेबाबतीत माणगाव पोलीस ठाण्यात कॉ गु रजि नं.४४/२०२२ भा दं.वि. स कलम ३८५/५०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास माणगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस नाईक कुंजन जाधव ह्या करीत आहेत.

# राज्याच्या मुख्य सचिवपदी मनुकुमार श्रीवास्तव

ते आपली विविध गाणी प्रेक्षकांना ऐकवत असतात.

मनुकुमार श्रीवास्तव यांना प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. कोल्हापूर आणि नागपूरमध्ये त्यांनी जिल्हाधिकारी म्हणून काम केलं आहे. तिथे त्यांच्या कामामुळे त्यांची कारकीर्द गाजली. सुरुवातीला महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागांत रचनात्मक काम केल्यानंतर २००८ साली ते मुंबईत आले. मंत्रालयात नगरविकास, महसूल, गृह खात्यांचे सचिव म्हणून त्यांनी उत्तमरित्या काम केलं. आज अखेर श्रीवास्तव यांची राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय पांडे यांची मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर मुंबईचे पोलिस आयुक्त हेमंत नगराळे यांची पोलिस आयुक्तपदावरून बदली करण्यात आली आहे. आता नगराळे हे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पाहतील. संजय पांडे यांनी यापूर्वी राज्याच्या पोलिस महासंचालकपदाची जबाबदारी सांभाळली आहे.

# खांदेश्वर बंगाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश

उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, खांदा कॉलनी शहरप्रमुख सदानंद शिर्के, नवीन पनवेल शहरप्रमुख यतीन देशमुख, युवासेना विधानसभा अधिकारी पराग मोहिते, महिला आघाडी विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, महानगर संघटीका सौ.ऍड. शुभांगी शेवाळे, उपमहानगर संघटिका सौ. संचिता राणे, खांदा कॉलनी शहर संघटिका सौ. सानिका मोरे, नवीन पनवेल शहर संघटीका सौ. अपुर्वा प्रभू यांची आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच यात्रसंगी खांदा कॉलनी शहर शाखेतील नवनियुक्त केलेल्या पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार सुद्धा करण्यात आला. यामध्ये उपमहानगर प्रमुख रामदास गोंधळी, उपमहानगर संघटक शिवाजी दांगट व शहर समन्वयक गणेश परब यांचा सुद्धा खांदा कॉलनी शहर शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खांदा कॉलनी शहर शाखेतील सर्व उपशहरप्रमुख, शहर संघटक, उपशहर संघटक, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, विभाग संघटक, उपविभाग संघटक, शाखाप्रमुख, महिला आघाडी, युवा सेना व सर्व आजी माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167
**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ९५ सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा : रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७७१७४३ | माणगाव निजामपूर विळे पाटणूस रस्ता रा.मा.९८ कि.मी. ८०/१०० मध्ये लहान पुलांची पुर्नबांधाणी करणे. तालुका म्हसळा (माणगाव), जिल्हा : रायगड. (५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग) | १२४८१७८१ | ११९९७६७९ | १२५००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |
| ७७१७४५ | होडगांव कुंभारवाडी साळवे रस्त्यावरील कि.मी. १/६६५ ग्रा.मा.५१ येथे मोठ्या पुलाचे पुर्नबांधकाम करणे. तालुका : माणगाव, जिल्हा : रायगड. (५०५४ मार्ग व पुल, ०४ जिल्हा व इतर मार्ग) | २११७९३४७ | २०१४०६७२ | १५०००० | २२४०/- | १२ महिने | इतर |
| ७७१७४८ | सेनवली पिटसई कुंबेत रस्त्यावरील कि.मी. ०/४०० ग्रा.मा.०६ येथे मोठ्या पुलाचे पुर्नबांधकाम करणे. तालुका तळा (माणगांव), जिल्हा : रायगड. (५०५४ मार्ग व पुल, ०४ जिल्हा व इतर मार्ग) | २४५६२६०७ | २४०१७०९९ | १५०००० | २२४०/- | १२ महिने | इतर |
| ७७१७४९ | पैठण कोतवाल बुद्रुक ते दाभाट धनगरवाडी ते परसुले रस्ता प्रजिमा-१०८ कि.मी. ०/०० ते ७/०० (मोऱ्यांची व पुलांची दुरुस्ती करणे). तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग) | १३१२६६६६ | १२९८७५३३ | १३२००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २५/०२/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ११/०३/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक (अ.क्र.२ व ३, चे कामासाठी) | मा.अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०४/०३/२०२२ वेळ १५.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १५/०३/२०२२ वेळ १२.०० वाजता |

टिप :- परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/७९५
दिनांक : २२/०२/२०२२

**सही/-**
**(आर.के.बामणे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर चषक २०२२ चा मानकरी मुकद्दर क्रिकेट संघ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये क्रिकेट खेळ हा सर्व क्रिकेट रसिकांना एक पर्वणीच ठरत असून यावर्षी पहिल्यांदाच शुभम गायकवाड मित्र परिवार यांच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चषक २०२२ टेनिस बॉल क्रिकेटचे आयोजन येथील प्रसिध्द वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल याठिकाणी करण्यात आले होते. त्यास असंख्य क्रिकेट प्रेमींनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

साखळी पध्दतीने खेळ घेण्यात आले होते एकूण सोळा संघांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवला.उत्कृष्ट खेळाडूंना आकर्षक ट्रॉफी तसेच रोख रक्कम देण्यात आली. शेवटच्या टप्प्यात अत्यंत चुरशीच्या वेळी बंड्या बॉईज संघावर मात करून मुकद्दर क्रिकेट संघाने विजेतेपद पटकावले तर उप विजेतेपद बंड्या बॉईज संघाला मिळाले. काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्या वतीने प्रथम क्रमांकास रोख रक्कम ३१००० रुपये तर उप विजेत्या संघाला कमिटी कडून १५००० रुपये आणि काँग्रेसचे माजी नगरसेवक शिवाजी शिंदे यांच्या माध्यमातून दोन्ही संघांना आकर्षक ट्रॉफी देण्यात आल्या.काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष शुभम गायकवाड हे एक होतकरू असून गावासाठी, समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची जिद्द आणि धडपड नेहमीच असते.

खेळाच्या माध्यमातून त्यांनी खेळाडूंना प्रोत्साहित केले असून त्यांच्या मागे युवा वर्ग ठामपणे उभा आहे.यावर्षी पहिल्यांदा त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चषक २०२२ चे आयोजन केले त्यास सर्वांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. विजेत्या संघांना तसेच सर्व नवोदित खेळाडूंना खुप खुप शुभेच्छा असे प्रतिपादन मनोज खेडकर यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, भास्कर शिंदे, राजू गायकवाड, अनिस शेख, अमोल चौगुले,अशोक कदम,किशोर सोनावळे,सुशांत नाईकडे ,हिमांशू सोनावळे, ढोले,यांसह नेरळ कर्जत येथील मान्यवर मंडळींसह गावातील सर्व संघांचे पाठीराखे उपस्थित होते. समालोचन मयुरेश कदम, अनिल नाईकडे, मंगेश मोरे यांनी केले.



## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# कातकरी उत्थान कार्यक्रमाला पोलादपूर तालुक्यात भरगच्च प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी रायगड जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीप्रवण भागात आपत्तीकाळात घ्यावयाची दक्षता व बचावकार्य तसेच मदतकार्य याबाबत प्रशिक्षण शिबिराचे पोलादपूर तालुक्यामध्ये यशस्वी आयोजन केल्यानंतर लगेचच कातकरी उत्थान कार्यक्रमाचे पोलादपूर तालुक्यात आयोजन केले असता या कल्याणकारी उपक्रमालादेखील कातकरी आदिवासी समाजाचा भरगच्च प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.



रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान व सप्तसुत्री कार्यक्रमांतर्गत शुक्रवार, दि. १८ फेब्रुवारी २०२२ रोजी पोलादपूर तालुक्यातील सडवली गावातील आदिवासी वाडी समाजमंदिरामध्ये सडवली, देवपूर, गांजवणे, खडपी, भोगाव, पैठण, कोंढवी येथील कातकरी समाजबांधव व महिलांच्या उपस्थितीत पहिला कार्यक्रम आयोजित केला. यावेळी कातकरी आदिवासी समाजातील महिला व पुरूषांचा कमी अधिक प्रमाणात प्रतिसाद मिळत असताना दुसरा कार्यक्रम मंगळवार, दि. २२ फेब्रुवारी २०२२ रोजी केवनाळे, करंजे, साखर, देवळे येथील कातकरी महिला व पुरूषांचे एकत्रितपणे कातकरी उत्थान शिबिर पितळवाडी गावातील राधाकृष्ण मंदिराच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले असता परिसरातील आदिवासी वाड्यांतील कातकरी समाजाच्या महिला पुरूष व बालकांसह आबालवृध्दांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या सुमन कुंभार, तहसिलदार दिप्ती देसाई, नायब तहसिलदार समीर देसाई, संजय मोदी, पुरवठा विभागाचे आबा जगताप तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. या शिबिरामध्ये कातकरी कुटूंबांच्या रेशनकार्ड संबंधित कामे, विविध प्रकारचे दाखले, मनरेगा जॉब कार्ड आदी प्रकारचे अर्ज घेऊन तयार दाखल्यांचे व रेशन कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र पितळवाडीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरामध्ये आदिवासी कातकरी समाजाच्या महिला व पुरूषांच्या कोवॅक्सीन आणि कोविशिल्ड लसीकरण व विविध रक्त तपासण्या करण्यात आल्या.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथील शंकरमंदिरामध्ये लोहारे, पार्ले, तुर्भे व दिविल येथील कातकरी उत्थानाचा कार्यक्रम तहसिल कार्यालयातर्फे भरगच्च उपस्थितीत आयोजित करण्यात आला असून येत्या गुरूवार, दि. ३ मार्च २०२२ रोजी कापडे बुद्रुक येथील ग्रुपग्रामपंचायत कार्यालयामध्ये कापडे बुद्रुक, रानबाजिरे, चांभारगणी व आड येथील कातकरी बांधव आणि महिलांचा कातकरी उत्थान व सप्तसुत्री कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून मंगळवार, दि. ८ मार्च २०२२ रोजी सवाद येथील शंकरमंदिरामध्ये सवाद, माटवण आणि हावरे येथील आदिवासी वाडीतील कातकरी महिला व पुरूषांना कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत विविध आरोग्य तपासण्या तसेच लसीकरणासह महसुल विभागाकडून देण्यात येणारे विविध दाखले, मनरेगा जॉब कार्ड तसेच कातकरी कुटूंबांच्या रेशनकार्ड संबंधित कामे करून घेण्यात येणार आहे. याप्रसंगी कातकरी समाजाच्या महिला पुरूषांना अन्य समाजबांधवांनी सकाळी साडेदहा वाजता नियोजित स्थळी उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन नायब तहसिलदार समीर देसाई यांनी केले आहे.

# कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध

### मालती आंग्रे अध्यक्षपदी, तर विभावरी कुळकर्णी उपाध्यक्षपदी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील कमळ महिला नागरी सहकारी पतपेढीच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली. त्यानुसार पुढील पाच वर्षांसाठी अध्यक्ष म्हणून मालती चंद्रकांत आंग्रे आणि उपाध्यक्ष म्हणून विभावरी विद्याधर कुळकर्णी यांची बिनविरोध निवड झाली आहे.

निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक बालाजी वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पतपेढीच्या सभागृहात निवडणूक घेण्यात आली. ती बिनविरोध झाली. यात संचालिका म्हणून अपर्णा श्रीनिवास पेंडसे, पूर्वा प्रशांत खेडेकर, पूनम सचिन बांदोडकर, उर्मिला अर्जुन वंजारी, अर्चना अनिलकुमार कुळकर्णी, चित्रा रमेश



मानकामे, वृंदा विनायक वत्सराज, मनीषा दिलीप विसपुते व सुषमा सुरेश जांभळे यांची निवड झाली आहे.

यावेळी संस्थेचे संस्थापक तथा तज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर तसेच संस्थेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. बालाजी वाघमारे यांनी निवडून आलेल्या संचालकांचा तसेच अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला, तर निवडणूक यथायोग्य पार पाडण्यास श्री. वाघमारे आणि दत्तात्रेय धायगुडे यांनी सहकार्य केल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. संस्थेच्या विद्यमान अध्यक्षांनी बिनविरोध निवडून दिल्याबद्दल संचालकांचे आभार मानले आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना सदिच्छा दिल्या.

# कर्जतमध्ये लोकन्यायालय

**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्याकडे नियोजित कार्यक्रमांतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड, तालुका विधी सेवा समिती कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १२ मार्च २०२२ रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. लोक न्यायालय मध्ये न्यायालयातील प्रलंबित व वाद अपूर्व खटले तसेच बँका, वित्तीय संस्था, बीएसएनएल, वीज वितरण कंपनी, नगर परिषद व ग्रामपंचायती कडील वादपूर्व प्रकरणे तडजोडीने मिटवण्यासाठी ठेवण्यात येणार आहे. तरी सर्व नागरिकांनी आपली प्रकरणे लोकन्यायालयात ठेवून निकाली काढली तर वेळेचा होणारा अपव्यय टाळता येईल अशी माहिती कर्जत दिवाणी न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष न्यायाधीश एम. व्ही. तोकले यांनी दिली.

# तळा बस स्थानकात मराठी भाषा दिन साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कै. वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून मराठी भाषा दिन साजरा करण्याची अंमलबजावणी करण्यात आली.



शासनाच्या आदेशानुसार सर्व स्तरावर साजरी केली जाते त्याचाच एक भाग म्हणून तळा बस स्थानकात २७ फेब्रुवारी२२ रोजी सकाळी ११वा.जेष्ठ पत्रकार किशोर पितळे यांच्या हस्ते फलकाला हार अर्पण व श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी पत्रकार श्रीकांत नांदगावकर, वाहतूक नियंत्रक विलास धोत्रे, विनायक केतकर, प्रमोद (नाना) रिसबुड उल्हास तळकर सिराजभाई कडू, अंगणवाडी सेविका सरीता चांडीवकर, अरूणा जाधव, ताई कांबळे किशोर सकपाळ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी पत्रकार पितळे यांनी वि.वा. उर्फ कुसुमाग्रज यांच्या पवित्र स्मृति ला अभिवादन करून मराठी भाषा दिन साजरा करण्याची संकल्पना स्पष्ट केली.


राव साहेब

अ‍ॅड.एस. काशिद

**जाहीर समन्स**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

रे.मु.नं.४२५/२०१९
नि.नं.१०/ड
ने.ता.०३/०३/२०२२

श्री.यश पाल — वादी
विरुद्ध
निलमदेवी सहारन

प्रति,
निलमदेवी सहारन
रा.भगवती हेरिटेज, सी–४०२
प्लॉट नं.२९ ते ३२, ४७ ते ४९ व
५२, सेक्टर २१, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९ — प्रतिवादी

वादी श्री.यश पाल यांनी तुमच्या विरुद्ध दावा हक्क प्रस्थपनेकरिता, खरेदीखत दस्त रद्द करण्याकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात दिवाणी दावा रे.मु. नं.४२५/१९ हा दावा दाखल केला आहे. सदर दाव्याकामी मे.कोर्टाच्या आदेशानुसार तुम्हास बेलिफामार्फत दाव्याकामी हजर राहण्यासाठी प्रतिवादी क्रं.१ यांना सदर दाव्यातील तुमच्या पत्यावर दोन वेळा समन्स व नोटीसची पाठविण्यात आली आहे. परंतु सदर जागेवर सध्या तुम्ही राहत नाही व आता कुठे राहत आहेत हे माहित नाही असे बेलिफ रिपोर्ट वरुन दिसत आहे.

तरी तुम्हास कळविण्यात येत आहे की, तुम्हास सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ म्हणून तुम्हाला पक्षकार करण्यात आले आहे. सदर दाव्याविरुद्ध तुम्हाला तुमचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याकरिता दि.३/३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे, सदर दाव्याकामी हजर होवून दाव्याची सुनावणी पुढे सुरू होण्यासाठी या वादीस मदत करावी. तुम्ही तसे न केल्यास तुमच्या विरुद्ध पुढील आदेश होवून मिळणेकरिता वादीतर्फे मे.कोर्टात अर्ज करून तुमच्या विरुद्ध पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आज दि.२२/०२/२०२२ माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


# आम आदमी पार्टी तर्फे सदस्य नोंदणी अभियान

**दै.रायगड नगरी । उरण**

आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीचा प्रचार व प्रसार करण्याच्या व पक्ष मजबूत करण्याच्या दृष्टीकोणातून उरण तालुक्यात आम आदमी पार्टीतर्फे सदस्य व कार्यकारिणी सभासद नोंदणी अभियान सुरु आहे.

अनेक व्यक्ती आम आदमी पार्टीच्या माध्यमातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. आम आदमी पक्षाला दिवसेंदिवस वाढता पाठिंबा मिळत असून ज्या व्यक्तींना आम आदमी पार्टी जॉईन करायचे आहे किंवा पक्षाचे सदस्य व्हायचे आहे त्यांनी आम आदमी पार्टीचे उरण विधानसभा मतदार संघ १९० चे तालुकाध्यक्ष संतोष भगत संपर्क क्रमांक ९९६९३२६६१२, ८८७९४७६६५५ यांच्याशी संपर्क साधावे. जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून पक्ष अधिक मजबूत करावा असे आवाहन आम आदमी पार्टीतर्फे करण्यात आले आहे.

# देवकान्हे येथे महाशिवरात्री उत्सव सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील देवकान्हे या गावी सालाबादप्रमाणे याही वर्षी आज मंगळवार दि.१ मार्च २०२२ रोजी कान्हेश्वर मंदिर येथे महाशिवरात्री उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या उत्सव सोहळ्याप्रसंगी पहाटे ५ वा.अभिषेक व पूजाविधी, सकाळी ७ ते दु.४ पर्यंत श्री.शिवलिलामृत ग्रंथाचे पारायण, सायं.४:३० वा.महाआरती, साय़.६ वा.हरिपाठ व शिवपाठ,रात्रौ.८ ते १० वा.ह.भ.प.भूषणमहाराज वरखले यांची किर्तनसेवा तद्नंतर ग्रामस्थ व महिला मंडळ धानकान्हे, देवकान्हे, पिंपळवाडी व बाहे ग्रामस्थ यांचे हरिजागर (जागर भजन) आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, मे. मॅजेस्टिक इन्फ्रा प्रमोटर्स अँड डेव्हलपर्स या भागीदारी संस्थेमधील श्री. भगवान सिंग चौधरी हे भागीदार वरील नमूद भागिदारी संस्थेमधून दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ रोजी निवृत्त होत आहेत. या भागीदार निवृत्तीचा कायदेशीर करारनामा दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ या दिवशी बनवण्यात आला आहे. तरीही सर्व नागरिकांनी नमूद भागीदारी संस्थेसोबतच्या पुढील व्यवहारासाठी याची नोंद घ्यावी.



**PUBLIC NOTICE OF AUDIT ASSIGNMENT**

We are inviting open bid for auditing of pre society formation accounts provided by the builder to the society

**ELIGIBILITY :**

Person should be chartered accountant having experience of minimum five years and Government panel auditor with experience of three years.

**SCOPE OF WORK :**

- Checking of books of accounts provided by builder to find out the truth and fairness.
- Verification of receipts and expenses disclosed by builder.
- Verification of receivables and payables disclosed by builder.
- Verification of assets and liabilities after its detail checking.
- Point important matters to be taken up by society for discussions / negotiations with builder.
- Presenting a fair report to the members of our SOCIETY.

**SUBMISSION OF BID**

The interested person can visit the society office between 11 to 5 pm within 5 days of publication of this notice to clarification of doubts which prior appointment and submit the bid within such period.

**CONTACT PERSON :- Manager Indiabulls Greens Marigold CHSL, Kon, Tal.Panvel, Dist : Raigad.**

**CONTACT NO : 8097792905**

**Date : 1/3/2022**

**Sd/-**
**SECRETARY**
**INDIABULLS GREEN MARIGOLD CHSL,**
**Village : Kon, Tal-Panvel, Dist-Raigad**



मा.श्री.गोडसे साहेब

अर्जदारांतर्फे वकील
सौ.सुप्रिया रुपेश मोरे
श्री.सागर सुरेश गोंधळी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२६१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०४/२०२२

कै.पापाराव धर्माराव ओबिनिंडी मयतचे वारस
१) श्रीमती.केसुबाई पापाराव ओबिनिंडी
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) कु.साईकुमार पापाराव ओबिनिंडी
वय : २७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) कु.प्रशांत पापाराव ओबिनिंडी
वय : २० वर्षे, व्यवसाय :
वरील सर्व रा.मु.मौजे : रुम नं.A/६०४,
प्लॉट नं.६०, देव दृष्टी नावडे फेज २
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मयत कै.पापाराव धर्माराव ओबिनिंडी हे दि.८/६/२०२१ रोजी मौजे : रुम नं.A/६०४, प्लॉट नं.६०, देव दृष्टी नावडे फेज २, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मरण पावले असून त्यांच्या नावे असलेल्या मालकीची क्रेन गाडी आहे. तीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :–

**क्रेन गाडीचे वर्णन**

| गाडीचा नंबर | चेसीस नंबर | इंजिन नं. | मॉडेल, कंपनी |
|---|---|---|---|
| MH 06 AL 2953 | 0000 1440 | V8B2110 01BXDO | P & H T 300 MOBIL CRANE |

सदर क्रेन गाडी सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी मयत कै. पापाराव धर्माराव ओबिनिंडी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२८ माहे ०२ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



Shri.Rao Saheb Court

Adv. S. Kashid

**PUBLIC NOTICE**

BEFORE THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.)
PANVEL AT-PANVEL

SUIT NO.425/2019
Exh : 11/D
Next Date : 03/03/2022

Mr.Yash Pal
Age : 65 years, Occupation : Business
Residing at-B2:03:13, Gharkul, Sect-15,
Kharghar, Navi Mumbai-410210 — Plaintiff
V/S
Neelam Devi Saharan
Age : Adult, Occupation : Nil
Residing at-Bhagawati Heritage, C-402
Plot No.29 to 32 47 to 49 & 52, Sect-21,
Kamothe, Navi Mumbai-410209 — Defendant

TAKE NOTICE THAT the plaintiff above named has/have filed Suit No.425/2019, In the Civil Judge (S.D.) Court Panvel, At-Panvel.

WHEREAS the suit above mentioned was listed in the Civil Judge (S.D.) Court Panvel, At-Panvel for the hearing / submission but as it is not possible to serve the notice by regular service to defendant hence the Hon'ble Civil Judge (S.D.) Court Panvel, At-Panvel ordered the service by substituted service i.e. Public Notice.

Notice is hereby given to defendant that, if you wish to contest the suit you are required to remain present on 03/03/2022 at 10:30 in person or pleader duly instructed and produce the documents in your defence on which you desire to rely on.

TAKE FURTHER NOTICE THAT in default of your appearance on the date and time above mentioned the plaintiff will be proceeded for determination in your absence and no further Notice in relation there to shall be given.

Given in my Hand on this 22 day of February 2022

Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D) Court Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superitent. Civil Judge (S.D) Court Panvel



मा.राव साहेब

अ‍ॅड.दिनानाथ कै. सोनकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज वरिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.४१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०३/२०२२

१) श्री.मनोरंजन भुबनेश्वर मोहन्ता
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : धंदा
२) कु.ममता मनोरंजन मोहन्ता
वय : २४ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कु.मीना मनोरंजन मोहन्ता
वय : २३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
१ ते ३ रा.रुम नं.१२०१, विंग–सी,
हावरे तुलसी, सी.एच.एस., प्लॉट नं.५२,
सेक्टर ९, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (प)
पिन कोड–४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

वरील अर्जदार नं.१) श्री.मनोरंजन भुबनेश्वर मोहन्ता २) कु.ममता मनोरंजन मोहन्ता आणि ३) कु.मीना मनोरंजन मोहन्ता राहणार रुम नं.१२०१, विंग–सी, हावरे तुलसी, सी.एच.एस., प्लॉट नं.५२, सेक्टर ९, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (प), पिनकोड–४१०२०६. अर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ आणि ३ यांची आई कै.सीमा मनोरंजन मोहन्ता हे दि.०४/०२/२०११ रोजी शिवाजी नगर हेल्थ सेंटर, औरंगाबाद मुन्सिपल कार्पोरेशन हॉस्पिटल, औरंगाबाद येथे मयत झाले. सदर मयताच्या नावे यांच्या मालकीची व स्वकष्टाची १/२ हिश्श्याची मिळकती असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**शॉप नं.६, पाटील कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१३, सेक्टर–९, खांदा कॉलनी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६, क्षेत्रफळ १७.६१ चौ.मीटर बिल्टअप + ४.८३ चौ.मीटर लॉफ्ट**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२५/२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

